वितरण आदेश क्र.१०

**राज्य प्रशिक्षण धोरणांतर्गत मंजूर तरतूदीमधून राज्य प्रशिक्षण नियंत्रण व मूल्यमापन यंत्रणा, यशदा पुणे, ६ विभागीय व ३५ जिल्हा प्रशासकीय प्रशिक्षण संस्थांना प्रशासकीय प्रशिक्षणाकरिता, ( प्रशिक्षण शुल्क ) प्रशासकीय व वित्तीय मान्यता देऊन, निधी वितरीत करण्याबाबत**

**योजनांतर्गत निधी सन २०१७-१८**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः टीआरएन २०१७/ प्रक्र.७९/१७/१२-अ**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : २७ डिसेंबर, २०१७.

वाचा : १. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थसं २०१७ /प्र.क्र.६८/अर्थसंकल्प,३ दि.१ एप्रिल, २०१७.
२. सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र. - बीयुडी-२०१७/ प्र.क्र.७० /२०१७/२५, दि.५ एप्रिल, २०१७
३. संचालक, राज्य प्रशिक्षण नियोजन मूल्यमापन यंत्रणा यशदा पुणे यांचे क्र.राप्रनिमूयं/प्रक्र.८६/२०१७-१८/७०६ दि. १७ एप्रिल,२०१७ चे पत्र.
४. सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र . बीयुडी२०१७-/ प्र ७०.क्र./२०१७/२५, दि २०.एप्रिल, २०१७
५. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांकः टीआरएन २०१७/ प्रक्र.७९/१७/१२-अ दि.२१ एप्रिल, २०१७
६. संचालक, राज्य प्रशिक्षण नियोजन मूल्यमापन यंत्रणा यशदा पुणे यांचे क्र.राप्रनिमूयं/प्रक्र.८६/२०१७-१८/ दि.२९.६.२०१७ चे पत्र.
७ . वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थसं/ २०१७ प्र.क्र/९४ .अर्थ-३ दि. ३० जून, २०१७.
८. उपमहासंचालक, राज्य प्रशिक्षण नियोजन मूल्यमापन यंत्रणा यशदा पुणे यांचे क्र.राप्रनिमूयं/२०१७-१८/सा.प्र.वि.-पत्रव्यवहार/२४० दि.२४ नोव्हेंबर,२०१७ चे पत्र.

**प्रस्तावना :-**

राज्य शासनाचे प्रशिक्षण धोरण प्रभावीपणे राबविण्याकरिता यशदा पुणे, या संस्थेमध्ये वर्ग १ चे अधिकारी, विभागीय संस्थांमध्ये वर्ग २ व वर्ग ३ चे अधिकारी व कर्मचारी व जिल्हा स्तरीय प्रशासकीय प्रशिक्षण संस्थांमध्ये वर्ग ३ व वर्ग ४ च्या कर्मचा-यांकरिता प्रशासकीय प्रशिक्षण घेण्याचे निश्चित झाले आहे. या प्रशिक्षणार्थ्यांकरिता निवास व भोजन व्यवस्था व इतर प्रशिक्षण संबंधित सर्व अनुषंगिक बाबी याकरिता १ नोव्हेंबर,२०१४ च्या शासन निर्णयान्वये यशदा पुणे, विभागीय व जिल्हा प्रशासकीय प्रशिक्षण संस्थांसाठी निवासी प्रशासकीय प्रशिक्षणाचे शुल्क मंजूर करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे, नवीन विषयाची तोंड ओळख या एक दिवसीय अनिवासी प्रशिक्षणाकरिता दि.३०.४.२०१६ च्या शासन निर्णयान्वये यशदा पुणे, विभागीय व जिल्हा प्रशासकीय प्रशिक्षण संस्थांसाठी प्रशिक्षण शुल्क मंजूर करण्यात आले आहे.

त्यानुसार, संचालक, राप्रनिमूयं, यशदा पुणे यांनी, संदर्भाधीन क्र.३ च्या पत्रान्वये सन २०१७-१८ या आर्थिक वर्षामध्ये यशदा पुणे, ६ विभागीय व ३६ जिल्हा प्रशासकीय प्रशिक्षण संस्थामध्ये एकूण ८०८०२ इतक्या प्रशिक्षणार्थी यांना पायाभूत प्रशिक्षण, पदोन्नतीनंतरचे प्रशिक्षण, उजळणी प्रशिक्षण व नविन विषयाची तोंडओळख या ४ प्रकारच्या प्रशासकीय प्रशिक्षणाचा आराखडा तयार करुन या संस्थांना

प्रशिक्षणाकरिता प्रशिक्षण शुल्क म्हणून रु. २७००.०० लाख इतक्या आवश्यक असणा-या निधी मागणीच्या प्रस्तावास मान्यता देण्याचे प्रस्तावित केले होते.

तथापि, यशदा कडून रु. २७००.०० लाख इतक्या रक्कमेचा प्राप्त झालेला प्रशिक्षण आराखडा **अंतिम** करण्यात येऊन, त्यास नियोजन व वित्त विभागाची प्रशासकीय मान्यता प्राप्त होण्यास काही कालावधी लागण्याची शक्यता होती. तसेच, सद्य:स्थितीत सर्व संस्थांमध्ये प्रशासकीय प्रशिक्षण सुरु झालेले होते. त्यानुसार, प्रशिक्षणार्थीच्या दैनंदिनी खर्च भागविण्यासाठी निधी उपलब्ध करुन देणे क्रमप्राप्त होते. त्यामुळे, या सर्व बाबी विचारात घेऊन या खर्चासाठी संदर्भाधीन क्र. २ च्या परिपत्रकान्वये अर्थसंकल्पित केलेल्या तरतूदीनुसार लेखा अनुदानाच्या मर्यादेत एप्रिल व मे २०१७ या दोन महिन्याच्या कालावधीकरिता प्राप्त झालेला रु. ४५०.०० लाख ( रुपये चारशे पन्नास लाख फक्त ) इतका निधी यशदा पुणे, ६ विभागीय व ३६ जिल्हास्तरीय प्रशासकीय प्रशिक्षण संस्थांना वितरित करण्यात आला आहे.

त्यानंतर संचालक, राप्रनिमूयं, यशदा पुणे, यांच्या संदर्भाधीन क्र.६ च्या पत्रान्वये, यशदा पुणे, ६ विभागीय व ३६ जिल्हास्तरीय प्रशासकीय प्रशिक्षण संस्थांकरिता सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरिता ८००४० प्रशिक्षणार्थीचा अंतिम प्रशिक्षणाचा आराखडा निश्चित करुन त्यानुसार KRA चे उद्दिष्ट ठरविण्यात आले आहे. त्यानुसार, यशदा पुणे, ६ विभागीय व ३५ जिल्हा प्रशासकीय प्रशिक्षण संस्थांना प्रशिक्षण आराखडयानुसार एकूण **रु. २६६१.७६** लाख **( रुपये सव्वीसशे एकसष्ट लाख, शहात्तर हजार फक्त )** इतकी प्रशिक्षण खर्चाची रक्कम निश्चित करण्यात आली आहे.

आता, या प्रशिक्षण आराखडयाच्या खर्चानुसार संदर्भाधीन क्र. ७ च्या शासन परिपत्रकान्वये राज्य प्रशिक्षण धोरणांअंतर्गत रु.२७००.०० लाख इतक्या अर्थसंकल्पिय तरतूदीनुसार ७० % मर्यादेत रु. **१८९०.०० लाख ( रु. अठराशे नव्वद लाख फक्त ) इतक्या प्रशासकीय प्रशिक्षणाच्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येऊन सदर्भाधीन क्र. ५ च्या शासन निर्णयान्वये** यशदासह सर्व संस्थांना **रु. ४५०.०० लाख इ**तके वितरित केलेले लेखा अनुदान वजा करता उर्वरित रु.१४४०.०० लाख ( रुपये चौदाशे चाळीस लाख ) पैकी, रु.११५०.०० लाख ( रुपये अकराशे पन्नास लाख फक्त ) इतके सहायक अनुदान वितरित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

राज्य प्रशिक्षण धोरणाच्या अंमलबजावणीसाठी मागणी क्र. ए-०४, २०७०-इतर प्रशासकीय सेवा ००-००३-प्रशिक्षण ००-१०- राज्य प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यासाठी विविध सुविधा व सहाय्य यावरील खर्च (२०७० ०८५३) ३१-सहायक अनुदान, कार्यक्रमावरील खर्च या लेखाशिर्षाखाली सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरिता संदर्भाधीन क्र. १ च्या शासन परिपत्रकान्वये एकूण रु.२७००.०० लाख ( अक्षरी रुपये सत्तावीसशे लाख फक्त ) इतका निधी अर्थ संकल्पात करण्यात आला आहे. संदर्भाधीन क्र.४ च्या शासन परिपत्रकान्वये अर्थसंकल्पिय अंदाजामध्ये केलेल्या तरतूदीच्या अनुषंगाने संपूर्ण अनिवार्य ३१,सहाय्यक अनुदान ( वेतनेतर ) नियंत्रक अधिकाऱ्यांच्या स्वाधीन करण्यात आले आहे.

२. संदर्भाधीन क्र. ८ च्या वित्त विभागाच्या दि.३०.६.२०१७ च्या शासन परिपत्रकानुसार अनिवार्य खर्चासाठी अर्थसंकल्पिय **तरतूदीच्या** एकूण रु.२७००.०० लाखाच्या **७० % च्या मर्यादेत** रु.१८९०.०० लाख ( रुपये अठराशे नव्वद लाख फक्त ) इतका निधी खर्च करण्याची मर्यादा विहित करण्यात आली आहे. त्यानुसार, **सदर्भाधीन क्र. ५ च्या शासन निर्णयान्वये** यशदासह सर्व संस्थांना **रु. ४५०.०० लाख**

**इ**तके वितरित केलेले लेखा अनुदान वजा करता उर्वरित रु.१४४०.०० लाख ( रुपये चौदाशे चाळीस लाख ) इतका निधी अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर उपलब्ध करुन दिला आहे.

३. आता, राज्य प्रशिक्षण नियंत्रण व मूल्यमापन यंत्रणेअंतर्गत संदर्भाधीन क्र.६ च्या पत्रान्वये, यशदा पुणे, ६ विभागीय व ३६ जिल्हास्तरीय प्रशासकीय प्रशिक्षण संस्थांकरिता सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरिता खालील दिलेल्या तक्त्यानुसार ८००४० प्रशिक्षणार्थीचा अंतिम केलेल्या प्रशिक्षणाचा आराखडयाच्या **रु. २६६१.७६ लाख - ( रुपये सव्वीसशे एकसष्ट लाख, शहात्तर हजार फक्त ) इतक्या** प्रशासकीय प्रशिक्षणाच्या खर्चापैकी, सदर अनुदानाच्या मर्यादेत अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर उपलब्ध झालेल्या **रु. १८९०.०० लाख ( रु. अठराशे नव्वद लाख फक्त ) इतक्या प्रशासकीय प्रशिक्षणाच्या खर्चास** वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग पहिला, उपविभाग-तीन, अ.क्र.४ परिच्छेद क्र. २७ (२) (अ) अन्वये प्रशासनिक विभागास प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन व सदर अधिकारातील रकाना क्र.६ खालील अटींच्या अधीन राहून **प्रशासकिय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.**

| **यशदा पुणे, ६ विभागीय व ३६ जिल्हा प्रशासकीय प्रशिक्षण संस्था यांचा सन २०१७-१८ करिताचा प्रशिक्षण आराखडा** | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **प्रशिक्षणाचे प्रकार** | **यशदा पुणे** निश्चित करण्यात आलेले प्रति प्रशिक्षणार्थी प्रति दिवसाचे प्रशिक्षण शुल्क **रु.२०००/-** | | **विभागीय प्रशासकीय प्रशिक्षण संस्था** निश्चित करण्यात आलेले प्रति प्रशिक्षणार्थी प्रति दिवसाचे प्रशिक्षण शुल्क **रु.१५०० /-** | | **जिल्हा प्रशासकीय प्रशिक्षण संस्था** निश्चित करण्यात आलेले प्रति प्रशिक्षणार्थी प्रति दिवसाचे प्रशिक्षण शुल्क **रु.१००० /-** | | **सन २०१७-१८ या आर्थिक वर्षातील सर्व संस्थांनिहाय एकूण प्रशिक्षण आराखडा, प्रशिक्षणाचे दिवस व एकूण प्रशिक्षण खर्च** **( रु.लाखात)** | | |
| | **प्रशिक्षणार्थी** | **रक्कम** | **प्रशिक्षणार्थी** | **रक्कम** | **प्रशिक्षणार्थी** | **रक्कम** | **प्रशिक्षणार्थी** | **प्रशिक्षणाचे दिवस** | **एकूण रक्कम** |
| पायाभूत- वर्ग-१ (४२ दिवस) | २५० | २१०.०० | ----- | - | - | - | २५० | १०५०० | २१०.०० |
| पायाभूत- वर्ग-२ (४२ दिवस) | - | - | १२० | ७५.६० | - | - | १२० | ५०४० | ७५.६० |
| पायाभूत- वर्ग-३ (१२ दिवस) | - | - | २००० | ३६०.०० | ३६८० | ४४१.६० | ५६८० | ६८१६० | ८०१.६० |
| पायाभूत- वर्ग-४ ( ६ दिवस ) | - | - | - | - | २९०० | १७४.०० | २९०० | १७४०० | १७४.०० |
| उजळणी वर्ग-१ (५ दिवस) | ५५० | ५५.०० | - | - | - | - | ५५० | २७५० | ५५.०० |
| उजळणी वर्ग-२ (५ दिवस) | - | - | ८४० | ६३.०० | - | - | ८४० | ४२०० | ६३.०० |
| उजळणी वर्ग-३ (५ दिवस) | - | - | ३२४० | २४३.०० | ८९७० | ४४८.५० | १२२१० | ६१०५० | ६९१.५० |
| उजळणी वर्ग-४ (३ दिवस) | - | - | - | - | ५८५० | १७५.५० | ५८५० | १७५५० | १७५.५० |
| नविन विषयाची तोंडओळख- (३ दिवस) | १६०० | ९६.०० | - | - | ---- | ----- | १६०० | ४८०० | ९६.०० |
| नविन विषयाची तोंडओळख -(१ दिवस) प्रशिक्षण शुल्क **रु.६०० /-** | - | - | १०४०० | ६२.४० | ३९०४० | २३४.२४ | ४९४४० | ४९४४० | २९५.५६ |
| प्रशिक्षकांचे प्रशिक्षण (२दिवस ) | ६०० | २४.०० | - | - | - | - | ६०० | १२०० | २४.०० |
| एकूण | **३०००** | **रु.३८५.००** | **१६६००** | **रु.८०४.००** | **६०४४०** | **रु.१४७३.८४** | **८००४०** | **२४२०९०** | **रु. २६६१.७६** |

४. सदर मान्यतेच्या अधीन राहून, यशदा पुणे, ६ विभागीय प्रशासकीय प्रशिक्षण संस्था व ३५ जिल्हा प्रशासकीय प्रशिक्षण संस्था यांना दि. १ एप्रिल २०१७ ते दि. ३१ ऑक्टोबर, २०१७ या सात महिन्याच्या कालावधीत संस्थांमध्ये झालेले प्रशिक्षण आणि दि. १ नोव्हेबर,२०१७ ते दि. ३१ जानेवारी, २०१८ या तीन महिन्याच्या कालावधीत होणारे प्रशिक्षण विचारात घेऊन प्रशिक्षण शुल्कानुसार

खाली दर्शविल्याप्रमाणे प्रशिक्षण खर्चासाठी **रु. ११५०.०० लाख ( रुपये अकराशे पन्नास लाख फक्त ) इतके "अनिवार्य ३१ सहायक अनुदान (वेतनेतर)" मंजूर करण्यात येत आहे.**

- "विवरणपत्र ए" यशदा पुणे, **रु. १७५.०० लाख**
- "विवरणपत्र बी" ६ विभागीय प्रशासकीय प्रशिक्षण संस्था **रु. ४१५.०० लाख**
- "विवरणपत्र सी" ३५ जिल्हा प्रशासकीय प्रशिक्षण संस्था **रु. ४८३.०० लाख**
- या व्यतिरिक्त यशदा पुणे, यांना सर्व जिल्हा संस्थांच्या प्रशिक्षण खर्चाकरिता **रु. ७७. ०० लाख** इतका अधिकचा निधी

----------------

**एकूण रु.११५०.०० लाख**

राज्य प्रशिक्षण नियंत्रण व मूल्यमापन यंत्रणा, यशदा पुणे, यांनी ३५ जिल्हा प्रशासकीय प्रशिक्षण संस्था यांना उपरोक्त तक्त्यातील विवरणपत्र "सी" मध्ये दर्शविल्याप्रमाणे निधी वितरित करावा.

५. यासाठी होणारा **(यशदा पुणे रु.१७५.०० लाख + ६ विभागीय प्रशासकीय प्रशिक्षण संस्था रु.४१५.०० लाख + ३५ जिल्हा प्रशासकीय प्रशिक्षण संस्था रु.४८३.०० लाख + अधिकचा निधी रु.७७.०० लाख ) एकूण रु. ११५०.०० लाख ( अक्षरी रुपये अकराशे पन्नास लाख फक्त ) इतका खर्च " मागणी क्र . ए-४-२०७० इतर प्रशासकीय सेवा ०० - ००३ -प्रशिक्षण ०० - १०- राज्य प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यासाठी विविध सुविधा व सहाय यावरील खर्च (२०७० ०८५३ )** इतके "अनिवार्य ३१ सहायक अनुदान ( वेतनेतर )" या लेखाशिर्षाखाली सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरिता मंजूर अर्थसंकल्पिय अनुदानातून भागविण्यात यावा व त्याच लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

६ सदरहू मंजूर करण्यात आलेले अनुदान व यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, पुणे या संस्थेने व सर्व विभागीय संस्थांनी तात्काळ कोषागारातून आहरित करावे. सदर अनुदानाची संबंधित कोषागारातून आहरित करण्यात आलेली रक्कम महालेखापाल कार्यालयातील लेख्यात त्याच शीर्षाखाली नोंदली गेली आहे किंवा नाही याची खात्री करुन घ्यावी.

७. संस्थांनी आता वितरीत करण्यात येत असलेल्या अनुदानाचे विनियोग प्रमाणपत्र (UTILIZATION CERTIFICATE) महालेखापाल, लेखा परीक्षा, महाराष्ट्र-१, मुंबई / महाराष्ट्र-२, नागपूर व शासनाला सदर विनियोग प्रमाणपत्रात बाबनिहाय तपशीलवार खर्चाची नोंद घेऊन तातडीने सादर करावे.

८. राज्य प्रशिक्षण नियंत्रण व मूल्यमापन यंत्रणा, यशदा पुणे यांनी संस्थांना प्राप्त झालेल्या निधीच्या अनुषंगाने शासनाने विहित केलेल्या प्रपत्रात प्रशिक्षणाची माहिती भरून सदर माहिती प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेपर्यंत शासनास प्राप्त होईल, अशा प्रकारे प्रमाणित करुन पाठविणे बंधनकारक करण्यात येत आहे.

९. यशदा पुणे, ६ विभागीय व ३५ जिल्हा प्रशासकीय प्रशिक्षण संस्था यांनी संस्थेमध्ये घेण्यात आलेल्या प्रशिक्षणनिहाय प्रशिक्षण शुल्क वितरित करणे, बंधनकारक करण्यात येत आहे.

१०. उपरोक्त अनुदानामधून केलेल्या खर्चाचे स्वतंत्र लेखे व पुस्तके तपासण्याचे अधिकार, महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई / महाराष्ट्र-२, नागपूर यांना राहतील व त्याकरिता सदर संस्था त्यांना संपूर्ण सुविधा उपलब्ध करुन देईल.

११. संस्थेने आर्थिक वर्ष २०१७-२०१८ मधील खर्च मंजूर अनुदाना इतका सीमित ठेवावा.

१२. सदर शासन निर्णय नियोजन विभाग व वित्त विभाग यांच्या सहमतीने व त्यांच्या अनुक्रमे संदर्भ क्र.१४३ /१७ /१४४३ दि. २३.११.२०१७ व संदर्भ क्र.५९७ /१७ /व्यय-४ दि.१५.१२.२०१७ अन्वये दिलेल्या मान्तेस अनुसरुनच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

१३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१७१२२७१४५१२४८२०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Ajit Sopanrao Deshmukh

Digitally signed by Ajit Sopanrao Deshmukh
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=3d2bd4ed83b4c722151f75f40dad09e69527159e04d26476bbf5363e7b1c3cb2, cn=Ajit Sopanrao Deshmukh
Date: 2017.12.27 15:01:13 +05'30'

**( अजित देशमुख )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

१. महालेखापाल ( लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा ), महाराष्ट्र-१, मुंबई
२. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), महाराष्ट्र-२, नागपूर,
३. महासंचालक, यशदा, राजभवन आवार, बाणेर रोड, पुणे,
४. विभागीय आयुक्त (सर्व विभाग)
५. जिल्हाधिकारी (सर्व जिल्हे)
६. उपमहासंचालक, राज्य प्रशिक्षण नियंत्रण व मूल्यमापन यंत्रणा, यशदा, राजभवन आवार, बाणेर रोड, पुणे,
७. संचालक, राज्य प्रशिक्षण नियंत्रण व मूल्यमापन यंत्रणा, यशदा, राजभवन आवार, बाणेर रोड, पुणे,
८. संचालक, सर्व विभागीय प्रशिक्षण संस्था ( नागपूर, पुणे, खोपोली, अमरावती, नाशिक, औरंगाबाद )
९. संचालक /विशेष कार्य अधिकारी / प्राचार्य सर्व जिल्हा प्रशासकीय प्रशिक्षण संस्था
( १. वाहतूक जिल्हा प्रशासकीय संस्था, भायखळा, २. न्युझीलंड हॉस्टेल, आरे कॉलनी,( गोरेगाव) प ,मुंबई व ३.जिल्हा शिक्षण आणि प्रशिक्षण संस्था,जव्हार,ठाणे ४०१६०३ वगळून )
१०. जिल्हा कोषागार अधिकारी, कोणकण भवर/पुणे/नाशिक/नागपूर/अमरवती/औरंगाबाद
११. उपकोषागार अधिकारी, पैठण, औरंगाबाद/ खोपोली, कोकण भवन/ पुणे/नाशिक/नागपूर/अमरवती
१२. अवर सचिव, नियोजन विभाग, ( कार्यासन १४४३) / वित्त विभाग ( व्यय-४/ अर्थसंकल्प-१४) मंत्रालय, मुंबई -३२
१३. अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग / कार्यासन -२५
१४. अपर मुख्य सचिव ( सेवा ), यांचे वरिष्ठ स्वीय सहायक,सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२,
१५. निवड नस्ती, कार्यासन-१२-अ

शासन निर्णय क्रमांकः टीआरएन २०१७/ प्रक्र.७९/१७/१२-अ दि.२७ डिसेंबर, २०१७

विवरणपत्र-ए

| अ.क्र. | यशदा पुणे शिखर स्था | सन २०१७-१८ करिता प्रशासकीय प्रशिक्षण शुल्काकरिता मंजूर अनुदान | एप्रिल २०१७ ते मे २०१७ या सहा महिन्यांकरिता वितरीत करण्यात आलेल्या अनुदानाची रक्कम | १ एप्रिल २०१७ ते ३१ ऑक्टोबर २०१७ पर्यंत झालेल्या प्रशिक्षणाच्या खर्चाची रक्कम | १ एप्रिल २०१७ ते ३१ ऑक्टोबर २०१७ पर्यंत झालेल्या प्रशिक्षणाच्या खर्चाची रक्कम धरुन नोव्हेंबर २०१७ ते जानेवारी २०१८ या तीन महिन्यांकरिता आगाऊ वितरीत करण्यात येणा-या अनुदानाची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | राज्य प्रशिक्षण नियंत्रण मूल्यमापन यंत्रणा,यशदा पुणे | रु. ३८५.०० लाख | रु. १२०.०० लाख | रु. २४१.२६ लाख | रु.१७५.०० |

विवरणपत्र-बी

| अ.क्र. | विभागीय संस्थांची नांवे | सन २०१७-८करिता प्रशासकीय प्रशिक्षण शुल्काकरिता मंजूर अनुदान | एप्रिल २०१७ ते मे, २०१७ या दोन महिन्यांकरिता वितरीत करण्यात आलेल्या अनुदानाची रक्कम | १ एप्रिल २०१७ ते ३१ ऑक्टोबर २०१७ पर्यंत झालेल्या प्रशिक्षणाच्या खर्चाची रक्कम | १ एप्रिल २०१७ ते ३१ ऑक्टोबर २०१७ पर्यंत झालेल्या प्रशिक्षणाच्या खर्चाची रक्कम धरुन नोव्हेंबर २०१७ ते जानेवारी २०१८ या तीन महिन्यांकरिता आगाऊ वितरीत करण्यात येणा-या अनुदानाची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | मराठवाडा प्रबोधिनी, औरंगाबाद | रु. १४९.४० लाख | रु. ३०.०० लाख | रु.११९.०० लाख | रु.१२५.०० लाख |
| २ | विदर्भ प्रबोधिनी, अमरावती | रु. १८४.२० लाख | रु. ३०.०० लाख | रु.४२.६७ लाख | रु.२५.०० लाख |
| ३ | रामेती, पुणे | रु. १०३.५० लाख | रु. ३०.०० लाख | रु.८५.०२ लाख | रु.६०.०० लाख |
| ४ | रामेती- खोपोली ,रायगड | रु. १२५.४० लाख | रु. ०५.०० लाख | रु. ४६.५१ लाख | रु.६०.०० लाख |
| ५ | नाशिक महसूल प्रबोधिनी, नाशिक | रु. १४४.०० लाख | रु. ३०.०० लाख | रु.९२.८३ लाख | रु.७०.०० लाख |
| ६ | वनामती, नागपूर | रु. ९७.५० लाख | रु. ३०.०० लाख | रु.९९.६० लाख | रु.७५.०० लाख |
| | एकूण | रु.८०४.०० लाख | रु. १५५.०० लाख | रु.४८५.६३ लाख | रु.४१५.०० लाख |

Ajit Sopanrao Deshmukh

Digitally signed by Ajit Sopanrao Deshmukh
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=3d2bd4ed83b4c722151f75f40dad09e69527159e04d26476bbf5363e7b1c3cb2, cn=Ajit Sopanrao Deshmukh
Date: 2017.12.27 15:01:27 +05'30'

( अजित देशमुख )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

## शासन निर्णय क्रमांकः टीआरएन २०१७/ प्रक्र.७९/१७/१२-अ दि.२७ डिसेंबर,२०१७

### विवरणपत्र-सी

| अ.क्र. | जिल्हा संस्थांची नांवे | सन २०१७-१८ करिता प्रशासकीय प्रशिक्षण शुल्काकरिता मंजूर अनुदान | एप्रिल २०१७ ते मे,२०१७ या दोन महिन्यांकरिता वितरीत करण्यात आलेल्या अनुदानाची रक्कम | १ एप्रिल २०१७ ते ३१ ऑक्टोबर २०१७ पर्यंत झालेल्या प्रशिक्षणाच्या खर्चाची रक्कम | १ एप्रिल २०१७ ते ३१ ऑक्टोबर २०१७ पर्यंत झालेल्या प्रशिक्षणाच्या खर्चाची रक्कम धरुन नोव्हेंबर २०१७ ते जानेवारी २०१८ या तीन महिन्यांकरिता आगाऊ वितरीत करण्यात येणा-या अनुदानाची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | **वाहतूक प्रशिक्षण संस्था,हंसराज लाईन,भायखळा,बृहन मुंबई.**<br>दि.४ जलै,२०१७ च्या शासन निर्णयान्वये सदर संस्थेचा प्रशासकीय प्रशिक्षण दर्जा रद्द करण्यात आला आहे. | रु. २३.८० | ----------- | --------------- | ----------------- |
| २ | **न्युझीलंड हॉस्टेल, आरे कॉलनी,( गोरेगाव) प ,मुंबई उपनगर प्रशिक्षण घेण्यात येत नसल्याने रक्कम शिखर संस्थेकडे जमा.** | रु.२३.०० | रु.५.०० लाख | **सदर संस्थेचे प्रशिक्षण रामेती खोपोली या जिल्हा संस्थेमध्ये घेण्यात येत आहे. त्यामुळे न्युझीलंड हॉस्टेल, आरे कॉलनी, ( गोरेगाव) प, मुंबई उपनगर या संस्थेकरिता यशदा पुणे यांना वितरित करण्यात आलेले रु.५.०० लाख रामेती खोपोली या संस्थेला यशदा पुणे यांनी वितरित करावे.** | |
| ३ | वनरक्षक प्रशिक्षण विद्यालय,शहापूर,ठाणे | रु.६०.९२ | रु.५.०० लाख | रु.६.३४ लाख | रु.५.०० लाख |
| ४ | वसंतराव नाईक राज्य कृषि विस्तार व्यवस्थापन संस्था ( रामेती ),खोपोली , रायगड | रु.२६.४० | रु.५.०० लाख | रु.२०.६५ लाख | रु.२५.०० लाख |
| ५ | **महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी,नाशिक**<br>दि.४ जलै,२०१७ च्या शासन निर्णयान्वये सदर संस्थेचा प्रशासकीय प्रशिक्षण दर्जा रद्द करण्यात आला आहे. परंतू विभागीय प्रशिक्षण संस्थेकडे रक्कम वर्ग करण्यात येत आहे. | रु.३२.७० | रु.५.०० लाख | रु.५.४६लाख | रु.५.०० लाख |
| ६ | दादासाहेब चौधरी वनरक्षक प्रशिक्षण संस्था पाल,जळगाव | रु.५३.१० | रु.५.०० लाख | रु.३७.०८ लाख | रु.४०.०० लाख |
| ७ | ग्रामसेवक प्रशिक्षण संस्था मांजरी फार्म,पुणे | रु.३८.२० | रु.५.०० लाख | रु.२२.८५ लाख | रु.२५.०० लाख |
| ८ | वानिकी प्रशिक्षण विद्यालय,कुंडल (कुंडल प्रबोधिनी), सांगली | रु.७३.०० | रु.५.०० लाख | रु.४२.१८ लाख | रु.४०.०० लाख |
| ९ | रामेती, गेट नं४ ,शहाजी नगर,मध्यवर्ती इमारती जवळ, लाईन बाजार, कोल्हापूर | रु.३३.२० | रु.५.०० लाख | रु.२०.७६ लाख | रु.२०.०० लाख |
| १० | **मराठवाडा महसूल प्रशिक्षण प्रबोधिनी, ओरंगाबाद** | रु.३२.०० | रु.५.०० लाख | रु.९.३५ लाख | रु.९.०० लाख |
| ११ | वनरक्षक प्रशिक्षण संस्था,देऊळगावराजा रोड, पी.बी९३.,जालना | रु.२२.२० | रु.५.०० लाख | रु.२३.५१ लाख | रु.१९.०० लाख |
| १२ | ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्र, मराठवाडा ॲग्रीकल्चर विद्यापीठ,परभणी | रु.४७.२० | रु.५.०० लाख | रु.१३.२३लाख | रु.१४.०० लाख |
| १३ | महाराष्ट्र लेखा व वित्त प्रशिक्षण केंद्र,मांगीलाल प्लॉट, कॅम्प रोड,अमरावती | रु.३३.६० | रु.५.०० लाख | रु.१३.८२ लाख | रु.१३.०० लाख |
| १४ | ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्र,बुलढाणा | रु.३२.८० | रु.५.०० लाख | रु.२२.५३ लाख | रु.२२.०० लाख |
| १५ | **आरोग्य आणि कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, माताकचेरी, श्रध्दानंद पेठ,नागपूर** | **रु.२४.००** | **रु.५.०० लाख** | ---- | **रु.०.०० लाख** |
| १६ | सेंट्रल फॉरेस्ट रेंजर कॉलेज,मूल रोड, चंद्रपूर०१- | रु.४०.७० | रु.५.०० लाख | रु.२३.६८ लाख | रु.२३.०० लाख |
| १७ | जिल्हा शिक्षण आणि प्रशिक्षण संस्था,जव्हार,ठाणे ४०१६०३ पालघर | रु.४६.६० | रु.५.०० लाख | पालधर जिल्हयाचे प्रशिक्षण शहापूर ठाणे ही संस्था घेत असल्यामुळे या संस्थेकरिता वितरित करण्यात आलेली रु.५.०० लाख इतकी रक्कम यशदा पुणे यांनी ठाणे या संस्थेने घेतलेले प्रशिक्षण विचारात घेऊन त्या संस्थेस सदर निधी वितरित करण्यात यावा. | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १८ | जिल्हा शिक्षण आणि प्रशिक्षण संस्था, मिरजोळे, रत्नागिरी-४१५ ६१२ | रु.३५.३२ | रु.५.०० लाख | रु.५.२३ लाख | रु.१.०० लाख |
| १९ | जिल्हा शिक्षण आणि प्रशिक्षण संस्था, तहसील कार्यालयाच्याबाजुला, कुंडल, जिल्हा-सिंधुदूर्ग | रु.६९.२० | रु.५.०० लाख | रु.१८.९१ लाख | रु.१८.०० लाख |
| २० | जिल्हा शिक्षण आणि प्रशिक्षण संस्था, जुने गरुड हायस्कूल इमारत, साक्री रोड, धुळे | रु.३७.९० | रु.५.०० लाख | रु.१९.७६ लाख | रु.१९.०० लाख |
| २१ | जिल्हा शिक्षण आणि प्रशिक्षण संस्था, जिल्हा परिषद आवार, गट सदन इमारत, नंदुरबार | रु.६३.५० | रु.५.०० लाख | रु.१७.५९ लाख | रु.१७.०० लाख |
| २२ | जिल्हा शिक्षण आणि प्रशिक्षण संस्था,जुने डी.एड. कॉलेज, संगमनेर, जिल्हा -अहमदनगर | रु.४७.५० | रु.५.०० लाख | रु.५.०६ लाख | रु.१.०० लाख |
| **२३** | **जिल्हा शिक्षण आणि प्रशिक्षण संस्था, फलटण, जिल्हा-सातारा** | **रु.३७.५०** | **रु.५.०० लाख** | **रु.२.५८लाख** | **रु.००.०० लाख** |
| **२४** | **जिल्हा शिक्षण आणि प्रशिक्षण संस्था, सोलापूर** | **रु.४०.७०** | **रु.५.०० लाख** | **रु.२.८७ लाख** | **रु.००.०० लाख** |
| २५ | जिल्हा शिक्षण आणि प्रशिक्षण संस्था,शिवाजी नगर, जिल्हा- हिंगोली | रु.६४.४० | रु.५.०० लाख | रु.९.०८ लाख | रु.०९.०० लाख |
| २६ | जिल्हा शिक्षण आणि प्रशिक्षण संस्था, मांजरा कॉलनीच्या बाजूला,अंबेजोगाई, जिल्हा- बीड | रु.२१.४० | रु.५.०० लाख | रु.४.७१ लाख | रु.०२.०० लाख |
| २७ | जिल्हा शिक्षण आणि प्रशिक्षण संस्था,श्रीनगर, जिल्हा-नांदेड | रु.४४.०० | रु.५.०० लाख | रु.१५.४६ लाख | रु.१५.०० लाख |
| २८ | जिल्हा शिक्षण आणि प्रशिक्षण संस्था,विद्यानगर, तांबरी विभाग, जिल्हा- उस्मानाबाद. | रु.४०.३० | रु.५.०० लाख | रु.९.२४ लाख | रु.१०.०० लाख |
| २९ | जिल्हा शिक्षण आणि प्रशिक्षण संस्था,बार्शी रोड, दत्त नगर,मुरूड,लातूर. | रु.८४.०० | रु.५.०० लाख | रु.३१.३२लाख | रु.३२.०० लाख |
| ३० | जिल्हा शिक्षण आणि प्रशिक्षण संस्था, आकाशवाणी केंद्राजवळ, जिल्हा-यवतमाळ. | रु.३३.२० | रु.५.०० लाख | रु.९.३४ लाख | रु.१०.०० लाख |
| ३१ | जिल्हा शिक्षण आणि प्रशिक्षण संस्था, संतोषी माता मंदिराजवळ, हनुमान वस्ती, जिल्हा- अकोला | रु.३०.९० | रु.५.०० लाख | रु.१४.२१ लाख | रु.१४.०० लाख |
| ३२ | जिल्हा शिक्षण आणि प्रशिक्षण संस्था,लखाळा,रायसोड रोड, जिल्हा -वाशिम | रु.१६.६० | रु.५.०० लाख | रु.९.९८लाख | रु.१०.०० लाख |
| ३३ | जिल्हा शिक्षण आणि प्रशिक्षण संस्था, वर्धा- | रु.३८.०० | रु.५.०० लाख | रु.२७.५५ लाख | रु.३०.०० लाख |
| ३४ | जिल्हा शिक्षण आणि प्रशिक्षण संस्था, शास्त्री चौक, भंडारा- | रु.४७.६० | रु.५.०० लाख | रु.४.२२ लाख | रु.०२.०० लाख |
| ३५ | जिल्हा शिक्षण आणि प्रशिक्षण संस्था,गंगाबाई रुग्णालयाजवळ, जुनी पंचायत समिती, नेहरू चौक, गोंदिया | रु.३३.२० | रु.५.०० लाख | रु.१३.५३ लाख | रु.१३.०० लाख |
| **३६** | जिल्हा शिक्षण आणि प्रशिक्षण संस्था, गडचिरोली - | रु.४५.२० | रु.५.०० लाख | रु.३.८६ लाख | रु.०२.०० लाख |
| | **एकूण** | **रु.१४७३.८४ लाख** | **रु. १७५.०० लाख** | **रु. ४८५.९४ लाख** | **रु.४८३.०० लाख ***  |
| | | | | | **+ रु.७७.०० लाख @** |
| | | | | **एकूण** | **रु. ५६०.०० लाख** |

**टीप :-१. यशदा पुणे या शिखर संस्थेकडून जिल्हा संस्थांना त्यांच्या क्षमतेनुसार प्रशिक्षणाचे उद्दिष्ट देण्यात आले आहे.**

**२. नागपूर, सातारा व सोलापूर या तीन संस्थांनी घेतलेले प्रशिक्षण विचारात घेता त्यांच्याकडे निधी शिल्लक असल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे त्यांना निधी वितरित करण्यात आलेला नाही.**

* यशदा पुणे यांना जिल्हा प्रशिक्षण संस्थांकरिता रु.१७५.०० लाख इतके प्रशिक्षण शुल्क दि.२१.४.२०१७ च्या शासन निर्णयान्वये वितरित करण्यात आले आहेत. या व्यतिरिक्त आता, यशदा पुणे यांनी जिल्हा प्रशिक्षण संस्थांना दि.१ एप्रिल,२०१७ ते दि.३१ जानेवारी,२०१८पर्यंतच्या कालावधीसाठी रु.४८३.०० लाख इतका निधी वितरित करावा.

**@ यशदास रु.७७.०० लाख इतका अधिकचा निधी सर्व जिल्हा संस्थांच्या प्रशिक्षण शुल्काच्या खर्चानुसार वितरित करण्यासाठी देण्यात येत आहे.**

Ajit Sopanrao Deshmukh

Digitally signed by Ajit Sopanrao Deshmukh
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=3d2bd4ed83b4c722151f75f40dad09e69527159e04d26476bbf5363e7b1c3cb2, cn=Ajit Sopanrao Deshmukh
Date: 2017.12.27 15:01:40 +05'30'

**( अजित देशमुख )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**